# २

# मोत्याचे पीक

- वि.स.खांडेकर

**लेखक परिचय :-**

**विष्णू सखाराम खांडेकर (१८९८ ते १९७६)** :- भारतीय साहित्य विश्वात कादंबरीकार व लेखक म्हणून परिचीत. कादंबरीकार म्हणून ओळख.कथा, रूपकथा,कविता, लघुनिबंध, नाटक, चित्रपट कथा, व्यक्तिचित्रे आणि समीक्षा अशा वैशिष्ट्यपूर्ण वाङ्मय प्रकारातून लेखन. मराठी कथा, वाङ्मयात रूपक कथा हा कथाप्रकार रूढ करण्याचे श्रेय खांडेकरांचे आहे. दोन मने, दोन ध्रुव, ऱ्हदयाची हाक, अमृतवेळ, ययाति, या कादंबऱ्या आहेत. विद्युतप्रकाश, नवमलका प्रकाश, हस्ताचा पाऊस, उणपाऊस, सुर्यकमळे, संजावत, कालिका, हे कथासंग्रह, मृगजळातल्या काळ्या, सुवर्णकळा, वेचलेली फुले, सोनेरी सावल्या आणि वन, देवता हे रूककथा संग्रह प्रकाशित आहेत.

**गडकरी** :- व्यक्ती आणि वाङ्मय, आगरकरः व्यक्ती आणि विचार, केशवसूतःकाव्य आणि कला, हे समीक्षा ग्रंथ १९४१मध्ये सोलापूर येथे भरलेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष होते. १९७४ त्यांची 'ययाति' कादंबरीला ज्ञानपीठ पुरस्कार मिळाला. पद्मभूषण पुरस्काराने त्यांना सन्मानीत करण्यात आले आहे.

खांडेकरांनी रूपककथा लेखन करून जीवनवादी संस्कारांनी संदेश दिला. कल्पकता, सुचकता आणि तत्त्व प्रतिपादनाची आवडी हे

"मोत्याचे पीक" ही रूपककथा 'कालिका' या कथासंग्रहातून घेतली आहे.भूख आणि दुःख हे मानवी जीवनाचे आदीम तत्त्वे आहेत पण मानवाला त्याची भ्रांत पडते हा विचार मांडला आहे. या रूपककथेमध्ये नक्षत्रानुरूप पाऊस पडत नाही. त्यामूळे लोकांना खाण्या-पिण्यासाठी अन्नाची टंचाई पडते त्यामूळे मानवाची भक व मानवी दुःख यांचे हुबेहूब चित्रण या कथेत आले आहे.

निसर्ग देवता मृगाचा पाऊस आणि मघांचा पाऊस भरपूर पडल्यामूळे मोत्यांप्रमाणे दिसणारे सुंदर भाताचे पिकाचे वर्णन येते. हस्ताचा पाउस पडला की मोत्यांच्या दाण्याप्रमाणे दिसणारा सुंदर जोंधळा तयार होतो. पण भात, जोंधळा सारेच क्षणभंगूर झाले आहे.

मोत्यांचे पाणी वर्षानुवर्षे टिकते! "देवा", यंदा नुसत्या स्वातीचा पाऊस पाड, खूप मोती पिकू देत, गोरगरिबांच्या व देवळांच्या दाराला मोत्यांचे तोरणे बांधू दे अशी हव्यास मोत्यांसाठी मानव करत आहे.त्या

मानवाची इच्छा वरूनदेतानी मान्य केली. पावसाळा आला, लोक मृगाची अत्यंत उत्कंठतेने वाट पहात होते पणमृगाची कांहीच चाहूल दिसली नाही. मधली सारी नक्षत्रही कोरडी गेली, लोकांच्या तोडचेच नव्हे तर पृथ्वीच्या पोटातले पाणीही पळून गेले.

माग नक्षत्र आले; पण मघा ही कोरड्याच गेल्या होत्या. लोकांच्या डोळ्यांत प्राण उभे राहिले. हस्तात पाऊस नक्कीच पडेल, हस्ताचा पाऊस मोठा असतो. हत्ती दूरच राहिला, ससा सुद्धा दिसला नाही! लोकांनी व्याकुळ दृष्टीने आभाळाकडे पाहिले. पण वासरू कितीही हंबरले तरी आटलेली गाय त्याला दूध कुठून देणार? अशी अवस्था पाहून सर्व मानव अस्वस्थ झाले.

स्वातीमध्ये मात्र उभ्या वर्षाचा पाऊस कोसळला. समुद्रातले शिंपले हास्यपूर्वक त्या सरीचे स्वागत करीत होते. सारे पाणबुडेही त्या साऱ्यांना या या म्हणत होते. परंतु जगाचा पाशिंदा शेतकरी आणि व्यापारी रडत होते. त्याच बरोबर उभ्या जगाचे पावसा अभावी काय हाल होणार याचे चित्र स्पष्ट उभा राहत होते. एकीकडे पाणबुडे मोत्यांचे शिंपले श्रमाने आणि आनंदाने मोती काढ्याचे काम करतात. शेतकऱ्यांना मात्र याचे दुःख झाले होते. पाणबुडीवाले समुद्रांतील मोती जणू काय त्यांना भाताची, जोंधळ्याची रास वाटत होती. पण तेथे नुसते मोत्याचेच पीक होते. त्यांच्यासमोर साऱ्या राशी मोत्यांच्याच होत्या. त्या राशी पाहून त्यांची तहानभूक हरपून गेली होती.

मोत्यांची रास बाहेर काढण्यासाठी तळमळ सुरू होती पण भूक ही फार वेळ भरून न निघणारी गोष्ट होती. प्रत्येकांच्या पोटांत कावळे ओरडू लागले. बरोबर आणलेली शिदोरी केव्हांच संपून गेली होती. मात्यांनी भरलेले हारे डोक्यावर घेऊन ते लोकवस्तीच्या दिशेने धावू लागली. तेथे त्यांना एक झोपडी दिसली. त्या झोपडीच्या दिशेने ते

पाणबुडीवाले मोत्यांचे पिक घेऊन आले होते. तेथे एक स्त्री आपल्या आईच्या पाठीवरून हात फिरवत होती. गाईचे वासरू गाईच्या दुधासाठी मृत्यूमुखी पडले होते.

पहिल्या पाणबुड्याने बाईला विचारले की, "वासरू कशामूळे मेले". तीने अत्यंत दुःखातच उत्तर दिले की, चारा नसल्यामूळे वासराचा मृत्यु झाला. बाईखूप गरिब आहे अशी कल्पना पाणबुड्याना झाली. तुझ्या वासरासाठी हे घे मोत्यांचा चारा म्हणून मोत्याचे पीक हातात घेऊन म्हणतो. तेथे बाईही मोत्याला पाहून आपली गाय-वासरू सर्व क्षणभर विसरून जाते. मोत्याच्या बदल्यात आम्हाला काय देणार तेंव्हा ती त्यांच्यावर रागावते पण त्यांनी भाकरीसाठीच मागणी केली आहे. हे तिला कळत नाही शेवटी पाणबुडीवाले त्या स्त्रीला म्हणतात की आज भाऊबीज आहे. आम्हाला तुम्ही ओवाळा आम्ही तुम्हाला भाऊबिजेची ओवाळणी म्हणून मोत्यांचे हार देणार आहे. पण एक अट आहे. भावाला जेवायला वाढल्याशिवाय ओवाळणी मिळणार नाही. पुन्हा स्त्रीला राग येतो. माझ्याकडे एकच भाकरी आहे तिही माझ्या मुलांसाठी ठेवली आहे चालते व्हा म्हणून आरडा ओरडा करते.

पाणबुडे तिथून गावामध्ये येतात. पण मुठभर मोती देऊन देखील कोणीही भाकरी देत नाही. भूक तर खूप लागली आहे. जीव कासावीस झाला आहे. डोक्यावरील मोत्याच्या पिकांचे ओझेही होत आहे. गावामध्ये देवळात देवापुढे हात जोडून बसलेला सन्यांशी भेटतो त्याला पाणबुडीवाले विचारतात की खाण्यासाठी अन्न का मिळत नाही. त्यावर सन्याशी म्हणतो "की कुठले अन्न, कोठून येणार अन्न" मृग, मघा, हस्ताचा पाऊस पडलाच नाही. फक्त स्वातीचा पाऊस पडला तो आपली भूक कधीच भागवत नाही. तो फक्त मोत्यांचेच पीक पिकवतो. पाणबुड्यालाच तो सन्यांशी म्हणतो की तुम्ही डोक्यावर आणलेल्या शिळ्या, उष्ट्या कसल्याही भाकरीचा

तुकडा मला द्या असे मागणी करतो. तेंव्हा ते पाणबुडीवाले सन्याशीचे पाय धरून मोत्यांचे आणलेले हार समुद्रामध्ये टाकून देतात. आणि सर्वांनी हाथ जोडून वरूण देवतेची प्रार्थना करून मृगाची, मघांचा, हस्तांचा पाऊसच आमचे अन्न आहे. स्वातीचा पाऊस आमच्यासाठी नको अशी भावना व्यक्त करतात.

थोडक्यात मानवाची भूक आणि दुःख हेच मानवी जीवनाचे तत्त्वे आहे. मानवाला याची भ्रांत पडू नये. कारण पाऊस पडला तर अन्न मिळेल नाजीतर अन्नावाचून मानवाचा अंत मात्र नक्कीच होईल यासाठी मोत्याचे पीक नको. आम्हाला मृग, मघा, हस्तांचा पाऊस हवा आहे. असे वरूण देवतांना प्रार्थना करतात.